# परिशिष्ट - १ अ

## नमुना- १

( नियम १३ पहा )

*********************************************************************************************

**जिल्हाधिकारी, जिल्हा नंदुरबार यांचे कार्यालय**

**क्रमांक : सा.शा./क/कक्ष-४/जिपपंसनि/कावि/७७३०/२०१९ दिनांक १८ .१२.२०१९**

महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे ) नियम, १९६२ मधील नियम १३, पोट-नियम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी, **डॉ.राजेंद्र भारुड, जिल्हाधिकारी नंदुरबार, जिल्हा नंदुरबार** याद्वारे यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ१ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्वाचक गणाकडून (यात यापुढे यांचा निर्देश **“ संबंधित निर्वाचक गण”** असा करण्यात आलेला आहे.) केल्या जाणाऱ्या निवडणूकीच्या संबंधात, पुढीलप्रमाणे तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहे:

अ) संबंधित निर्वाचक गणांसमोर उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये, विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही संबंधित निर्वाचक गणांच्या संबंधातील नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी अखेरीची तारीख व वेळ असेल;

ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख आणि वेळ संबंधित निर्वाचक गणाच्या बाबतीत नामनिर्देशनपत्राच्या छाननीसाठीची तारीख व वेळ असेल;

क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची आणि त्याची छाननी करण्याची ठिकाणे असतील.

ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख ही **अक्कलकुवा** पंचायत समितीसाठी व्यक्तीची निवडणूक ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख असेल;

इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ६ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली वेळ ही, ज्यावेळी मतदान घेण्यात येईल ती वेळ असेल;

फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ७ मध्ये निर्वाचक गणापुढे विनिर्दिष्ट केलेली तारीख व वेळ ही, मतमोजणीची तारीख व वेळ असेल;

ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ८ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, मतमोजणीची ठिकाणे असतील.

Scanned by CamScanner

# अनुसूची

| निर्वाचक गणाचे नाव | | नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र सादर करण्याची व त्यांची छाननी करण्याचे ठिकाण | आवश्यक असेल तर ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीसाठी तारीख व वेळ | मतमोजणी करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| तालुका - अक्कलकुवा | | | | | | | | |
| १ | सिदुरी | सोमवार दिनांक २३.१२.२०१९ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत ( रविवार दि. २२.१२.२०१९ रोजी सार्वत्रिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) | मंगळवार दिनांक २४.१२.२०१९ सकाळी ११.०० वाजल्यापासुन | तहसिलदार यांचे दालन, तहसिल कार्यालय, अक्कलकुवा | मंगळवार दिनांक ०७.०१.२०२० | सकाळी ७.३० ते ५.३० वाजेपर्यंत | बुधवार दिनांक ०८.०१.२०२० सकाळी १०.०० वाजेपासून | तहसिल कार्यालय, अक्कलकुवा |
| २ | भांग्रापाणी | | | | | | | |
| ३ | मोलगी | | | | | | | |
| ४ | भगदरी | | | | | | | |
| ५ | पिंपळखुटा | | | | | | | |
| ६ | वडफळी | | | | | | | |
| ७ | वेली | | | | | | | |
| ८ | डाब | | | | | | | |
| ९ | ओहवा | | | | | | | |
| १० | होराफळी | | | | | | | |
| ११ | मोरंबा | | | | | | | |
| १२ | पेचरीदेव | | | | | | | |
| १३ | रायसिंगपूर | | | | | | | |
| १४ | मे. अंकुशविहिर | | | | | | | |
| १५ | खापर | | | | | | | |
| १६ | कोराई | | | | | | | |
| १७ | अक्कलकुवा १ | | | | | | | |
| १८ | अक्कलकुवा२ | | | | | | | |
| १९ | गंगापूर | | | | | | | |
| २० | सिंगपूर बु. | | | | | | | |

**टिप :-**

१ राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेले संकेतस्थळ http://panchayatelection.maharashtra.gov.in यावर बुधवार, दि. १८ डिसेंबर २०१९ (सकाळी ११.०० वा.) पासुन सोमवार, दि. २३ डिसेंबर २०१९ (दुपारी २.३० वा.) पर्यंत नामनिर्देशनपत्र भरता येतील.

२ संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशन पत्र बुधवार, दिनांक १८ डिसेंबर २०१९ ते सोमवार, दिनांक २३ डिसेंबर २०१९ ( सुटीचे दिवस दिनांक २२ डिसेंबर २०१९ वगळून ) प्रत्येक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत निर्वाचन अधिकाऱ्यांकडे स्विकारले जातील.

३ वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक २४ डिसेंबर २०१९ वार मंगळवार (छाननीनंतर लगेचच)

४ अपिल करण्याची शेवटची तारीख - शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०१९

५ जिल्हा न्यायाधिशांना अपिलांवर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख- सोमवार, दिनांक ३० डिसेंबर २०१९

६ जिल्हा न्यायाधिशांनी अपील निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे तारीख - सोमवार, दिनांक ३० डिसेंबर २०१९

७ उमेदवारी मागे घेणे -
अ) (जेथे अपिल नाही तेथे ) - सोमवार, दिनांक ३० डिसेंबर २०१९ (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत )
ब) (जेथे अपिल आहे तेथे) - बुधवार, दिनांक ०१ जानेवारी २०२० (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत )

८ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप -
अ) (जेथे अपिल नाही तेथे )- सोमवार, दिनांक ३० डिसेंबर २०१९ (दु. ३.३० नंतर )
ब) (जेथे अपिल आहे तेथे) - बुधवार, दिनांक ०१ जानेवारी २०२० ( दु. ३.३० नंतर )

९ निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे - शुक्रवार, दिनांक १० जानेवारी २०२० पर्यंत

स्थळ :- नंदुरबार
दिनांक :- १८ डिसेंबर, २०१९

( डॉ. राजेंद्र भारुड )
जिल्हाधिकारी नंदुरबार

Scanned by CamScanner